प्रेस नोट दिनांक 07.07.2018

दिनांक 09.03.2018 रोजी फिर्यादी नामे श्री अतुल हरणदास सहारे, रा. महादेव खोरी, फुलबासा कॉलनी यांनी पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे रिपोर्ट दिला की, दिनांक 09.03.2018 रोजी रात्री दरम्यान ते घरात झोपलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे घराचे खिडकीचे ग्रील मधुन हात घालून विवो कंपनीचे दोन मोबाईल फोन किंमत 22,000 रुपयांचे चोरुन नेले. त्यांचे रिपोर्ट वरुन अपराध कमांक 273/18 कलम 380 भा.दं.वि. चा गुन्हा दाखल करुन फ्रेजरपुरा पोलीसांनी तपास सुरु केला.

त्याच दरम्यान सायबर पोलीस स्टेशनने सुध्दा सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. गुन्हयातील संशयीत आरोपीचा सतत दोन दिवस गोपनिय माहीती घेवून शोध घेतला असता सदर गुन्हयातील संशईत इसम नामे आदर्श मिलींद तायडे, वय 18 वर्षे, रा. महादेव खोरी यास सायबर पो.स्टे. येथे आणुन त्याची कसुन चौकशी केली असता सदर गुन्हा त्याने केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हा उघडकीस आणुन त्यास पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई सायबर पोलीस स्टेशनचे पो.नि. श्री अनिल कुरळकर व सपोनि श्री कांचन पांडे यांचे मार्गदर्शनात पो.उप नि श्री ईश्वर वर्गे, नापोकॉ ताहेर अली, सुधिर चर्जन, पो.कॉ. गोपाल सोळंके, सचिन भोयर, पंकज गाडे, मयुर बोरेकर, जाकीर खान यांनी सदरची कारवाई पार पाडली.